**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.9 No.6** **July – Aug 2022**

# यातिहीनतेचे दु:ख ते संतपद : संत चोखामेळा

**डॉ. अशोक भानुदासराव केंद्रे**
विभाग प्रमुख मराठी, कै सौ शेषाबाई सीताराम मुंडे कला महाविद्यालय,
गंगाखेड. जिल्हा:परभणी- 431514
***Corresponding Author-* डॉ. अशोक भानुदासराव केंद्रे**
ई-मेल - ashokb.kendre@gmail.com
*DOI- 10.5281/zenodo.7070933*

**सारांश**

संत चोखामेळा : जन्म अज्ञातवर्ष;- इ.स.१३३८ चोखाबा हे यादवकाळातील नामदेवांच्या संतमेळ्यातील वारकरी संतकवीहोते.चोखोबांचा जन्म विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यात देऊळगाव राजा तालुक्यातील मेहुणा किंवामेहुणपुरी या गावी झाला. संत चोखामेळांचे कुटुंब हे जातीने महार होते. (चोखोबांचा जन्म पंढरपूरला झाल्याचे संत महिपती सांगतात.) चोखोबा मूळ वऱ्हाडातील आहेत असेही म्हटले जाते. त्यांची पत्नी सोयरा, बहीण निर्मळा, मेहुणा बंका व मुलगा कर्ममेळा हे सर्व प्रपंचाचे काबाडकष्ट उपसत असतानाच नित्यनेमाने व भक्तिभावाने पांडुरंगाचे नामस्मरण व गुणसंकीर्तन करीत होते. चोखोबांचा मृत्यू गावकुसाच्या कामात दरड कोसळून झाल्याचे सांगितले जाते. त्यांच्या मृत्यूनंतरही त्यांच्या हाडांतून विठ्ठल नामाचा गजर ऐकू येत होता, यावरून नामदेवांनी चोखोबांची हाडे ओळखून ती गोळा केली व पंढरपूरला विठ्ठल मंदिरासमोर त्यांची समाधी बांधली असे चरित्रकार सांगतात. संत चोखोबा हे एक, संत ज्ञानेश्वरांच्या प्रभावळीतले संत होते. संत नामदेव हे त्यांचे गुरू होत. तत्कालीन सामाजिक विषमतेमुळे चोखोबा होरपळून निघाले. ते शूद्र-अतिशूद्र, गावगाडा, समाज जीवन, भौतिक व्यवहार, उच्चनीचता व वर्णव्यवस्था यांच्या विळख्यात अडकले.

## प्रस्तावना

संत चोखामेळा हे प्रापंचिक गृहस्थ. ते उदरनिर्वाहासाठी मोलमजुरी करत, पण ते विठ्ठलाच्या नामात सतत दंग असत. गावगाड्यातील शिवाशिवीच्या वातावरणात त्यांचा श्वास कोंडला जात होता. दैन्य, दारिद्ऱ्या, वैफल्य यांमुळे ते लौकिक जीवनात अस्वस्थ होते. परंतु प्रत्यक्ष परमेश्वराने त्यांना जवळ केले, त्यांना संतसंग लाभला. त्यांना मंदिरांत प्रवेश नव्हता. श्रीविठ्ठलाला त्यांना इतरांप्रमाणे उराउरी भेटावे असे खूप वाटत होते. परंतु ते सावळे, गोजिरे रूप महाद्वारातूनच पाहावे लागे, ही खंत त्यांच्या मनात होती.

ब्राह्मणांचा उष्टा आंबा ओटी ठेवल्याने चोखोबांचा जन्म झाला, अशी दंतकथा जरी असली तरी शूद्र समाजातील नावे शूद्र ठेवली जात होती असे इतिहास सांगतो. महार जातीत जन्म घेतलेले संत चोखामेळा नामदेवांच्या आग्रहावरून वारकरी संप्रदायाचे उपासक झाले. हे जरी सत्य असले तरी चोखोबांना वारकरी संप्रदायामध्ये समाविष्ट करून घेण्याचा मोह नामदेवांना झाला. म्हणून संत चोखामेळा महामानव होते. हे निर्विवाद सत्य आहे. धर्माच्या,जातीच्या व्यवस्थेचा विचार करता एखादी शूद्र समाजातील व्यक्ती काव्य निर्मिती करते स्वतःच्या भाव-भावनांना वाट मोकळी करून देते हा चोखामेळाच्या क्रांतिकारी ठसा आहे. वारकरी सांप्रदायाच्या सर्वंकष विचारसरणीला व समानतेच्या तत्वाला प्रगल्भ स्वरूप प्राप्त करून दिले. जीवनाचे महत्त्व व सत्य चोखोबांना कळले तरी त्यांच्या काव्यातून जाती विषयाचा उल्लेख शूद्रव्यच प्राप्त करून देणार आहे. विठ्ठल देव उच्चवर्णीयांचा होता. म्हणूनच देवाच्या गळयातील हार चोरीला गेल्यावर चोखोबांना मारहाण केली. मागील जन्मात कृष्णनिंदा घडली होती व त्याचे फळ म्हणून या जन्मी महार जातीत जन्म झाला, असा उल्लेखही चोखामेळा आपल्या अभंगातून करतात. उघड विरोध करण्याची मुभा नसल्यामुळे कदाचित चोखोबांना स्वतःच्या पयरीने वागावे लागले असावे. असा अंदाज ही चुकीचा ठरू शकत नाही.

**'बहु भुकेला जाहलो l**
**तुमच्या उष्ट्यासाठी आलो II'**

हा विठ्ठल भक्तीचा महिमा जरी त्यांनी आपल्या भक्तीतून गाईला असला तरी जातीयतेचा हा एक न्यूनगंड संत चोखामेळा यांना पछाडणारा होता, असेच दिसते. विचार हा सावकाशपणे अभिव्यक्त

झाला आहे. हीन जातीत जन्म झाल्यामुळे हीन कामे वाट्याला आली, त्याचा प्रत्यय पदोपदी त्यांच्या अभंगातून व्यक्त होतो. विठ्ठल भक्ती, पंढरी महात्म्य हे त्यांच्या काव्याचे विशेष असले तरी जातीसंबंधी पुरेसे दाखले धारण करून त्यांची प्रतिभा उभी राहिलेली आहे.

स्वतःच्या जाती विषयी चोखामेळा सांगतात की, एकूण अमंगळ कुळात माझा जन्म झालेला आहे. त्यामुळे या विषयाचा मला वीट आला. या विटलेल्या आयुष्यातून मुक्त करण्यासाठी विटेवरी विठ्ठलाचे पाय चोखामेळा धरतात. उष्टी- खरकटी खाणारा माझा समाज अमंगळ आहे. मांसाहार हा या समाजाच्या जीवनाचा भाग आहे. त्यांच्या बोलण्यातून शिव्या - शापांचा भडिमार असतो. त्यांच्या कुळात जन्म होऊन मला काचणी पडली आहे.

**'चोखामने ऐसा पडलो काचनी I**
**सोसू हे जाचणी कोठवरीII'**

जातीचा जाच सहन करण्याची चोखोबांना शक्ती नाही, हे त्यांच्या काव्यातून स्पष्ट होते. हीन जाती विषयीचे दुःख व वेदना त्यांच्या काव्यातून प्रकट होते. या जगाच्या बहुत प्रकारचे गुणधर्म सांगताना अनामिक गावातील नीच जाती, जिच्या अंगी भावाभाव नाही, भक्तीचा लवलेश नाही व कोणतीच आध्यात्मिक परंपरा नाही. चोरी,लबाडी,भ्रष्टपणाचे हीनत्व जन्माला आले. चोकोबांचा टाहो फुटतो. मात्र सर्व जातीला सुधारण्यापेक्षा त्यांनी स्वतःचीच शुद्धी पांडुरंगाकडे मागितली आहे. मायबाप म्हणून ते जोहार करतात. तत्कालीन समाजातील स्थिती किती बिकट होती याचा परिचय देणारा इतिहास जणू त्यांच्या शब्दातून व्यक्त होतो. तुकारामांनी जातीचे दुःख केले नाही. किंवा हिन जातीत जन्माला आल्याचा पश्चाताप केला नाही. मात्र चोखोबांच्या अभंगातून व्यक्त झालेली भावना ही कुणबी जातीपेक्षा महार जातीचे बंदिस्त आयुष्य कसे होते हे प्रतिपादन केल्याशिवाय राहत नाही.

देवाला स्पर्श झाल्यावर देव बाटतो व महाराणा त्याची शिक्षा केली जाते. एकूणच समाज रचनेत शुद्रातिशूद्राची अवस्था ही वाईटच होती. ज्ञानाचा, भक्तीचा, पूजनाचा व वेद पठणाचा हक्क हिरावून घेतलेल्या शूद्र जातीतील ही अवस्था होय. स्वतःच्या हक्कासाठी विद्रोह न करता वाट्याला आलेले आयुष्य हे पूर्वजन्मीचे फळ म्हणून भोगण्याची वृत्ती तत्कालीन समाजाची होती. पूर्वी निळोबांच्या भक्तीचा गवगवा होता. त्याच निळोबाचा अवतार घेऊन मी आलो आहे. कृष्णाची निंदा ज्या वाचेने केली त्याची शिक्षा म्हणून हा जन्म माहाराच्या घरी भोगाव लागला. विटाळ हा शूद्र जातीच्या वाटेला आलेला जन्मजात भाग होता. इतर समाजाने महाराचा विटाळ पाळणे हा नियम होता. जर एखाद्या सज्जनाने शूद्र जणांना जवळ केले तर त्याला वाळीत टाकण्याचा व ज्ञाती भ्रष्ट केल्याचा आरोप केला जात होता. अवघा समाज विटाळ- विटाळ म्हणून दूर करतो तेव्हा चोकोबा विठ्ठलाला पदरात घेण्याची भीक मागतात. धावून येणारा विठ्ठल हा भक्ताचा कैवारी आहे. तो आपल्या भक्ताच्या दुःखात सहभागी होतो. भक्तवत्सल पांडुरंगाला करुणेचा धावा करून हिनजातीपासून सुटका करून घेण्यासाठी व भक्तीचा वाटा मागण्यासाठी चोखोबा विनंती करतात.

शेतीचे व गावकीचे काबाडकष्ट करणाऱ्या चोखोबांची स्थिती ही त्यांच्या शब्दात अभिव्यक्त गुणशैली आहे. सरनाजवळ रात्रभर पहारा देणाऱ्या व तुकड्यासाठी दारोदार फिरणाऱ्या महाराच्या भक्तीला विशेष महत्त्व आहे. वितभर पोटाचा अट्टहास भागविणे महत्त्वाचे नाही, परंतु स्वाभिमानाला पायदळी तुडविल्यावर येणारा अनुभव हा तत्कालीन समाज व्यवस्थेचा परिपाक होता हे सिद्ध होते. मानवाने मानवाला हीन समजण्याचा प्रकार चोखोबांना सहन न होणारा आहे. विठ्ठलाचे कारण पुढे करून सतावणाऱ्या सनात आणि वर्तनाच्या विरोधात चोखोबा स्पष्ट उच्चार करीत नसले तरी त्या वृत्तीचा समाचार ते समोपचाराने घेतात व करुणामय शब्दात संदेश देण्याचा प्रयत्न करतात.

जन्माला येणारा कोणता प्राणी सोवळा आहे, म्हणून त्याला विटाळ करण्याचा अधिकार आहे? जर जातीने विटा होतो तर जन्म -मृत्यूच्या वेळी विटाळ करण्याचे कारण काय? हा प्रश्न चोखामेळांना पडतो. विटाळाचे कारण जन्म व जात नाही, व्यक्तीचा स्वभाव आहे. देहाचे मूळ हे विटाळाचे घर आहे.

**'आदीअंती अवघा विटाळ साचला I**
**सोवळा तो झाला कोण कळे II'**

कोणत्या जातीत जन्म व मृत्यूला विटाळ मानले जाते. मात्र आदी व अंत्य हे दोन्हीही विटाळ असतील तर सोहळेपण हे मध्येच कुठून निपजते? देवाशी आणि शास्त्राशी विटाळ होतो लेखणारे व मांडणारे पुराण व पुराणिक हेच अमंगळ आहेत. जीव- देव -शिव हा विटाळाचा नाही. तर कायाच (शरीर) विटाळाने भरलेली असते. उच्च जातीत जन्म घेऊनही एखादा थोर हा निर्मळच असेल असे कशावरून? मानवी वर्तन हेच विटाळाचे मूळ आहे. वरच्या रंगाला भुलणाऱ्या बाह्य जगाला ते संदेश देतात की,

**' ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा I**
**काय भुललासी वरली या रंगा II '**

बाह्य रंगावरून कुणाची ओळख करून घेणाऱ्या अधम माणसासाठी चोखोबांचे हे भाव तरलतेने, तन्मयतेने येतात. जगाला स्वतःचा परिचय करून देण्यासाठी चोकोबांना स्वतःला सिद्ध करण्याचा मोह होतो. व्यवहारी भावनांना हृदयाच्या तराजूतून मापणाऱ्या वृत्तीला ते आत्मपरीक्षणाची महती सांगतात. भोंदू वृत्तीने वागणाऱ्या अधमांचा प्रखर समाचार घेताना माकडासारखे चाळे करणाऱ्या भोंदूला दोष देतात. देवाला भावनेने बांधल्यावर भक्त व देवाचे अतुल नाते जुळते, मात्र मध्यस्थी करणारे व देवाला बंदिस्त करणारे अधम हे भक्त व देवामध्ये दुरावा करणारे होत. स्वहिताला मुकणाऱ्या कर्मठ मूर्ख वृत्तीला तुकोबा दोष देऊन विठ्ठलाच्या कल्पनेला निस्तनाबूत करण्याचा प्रयत्न करतात. समाजस्थिती ही समाजाच्या व्यवहाराचे वर्णन करणारी असते. जाती-पाती,रोटी-बेटी याचप्रमाणे मंगळ-अमंगळ आणि आर्थिक सुबत्ता आहे समाज रचनेचे विशेष धुर्त षडयंत्र होय. हीन जातीतील समाजाशी वरच्या वर्गाने कोणत्याही प्रकारचे व्यवहार न करणे हा समाज गोठविण्याचा प्रकार कर्मठ मानसिकतेच्या धूर्तपणाचे अपत्य होय.

**' विटाळाचे अंगी विठ्ठलाचे फळ I**
**चोखा तो निर्मळ नाम गाय II '**

ज्याला विटाळ, भेद, तुच्छ, शूद्र, मानायचे असेल ते मानित बसो, त्याचा विचार न करता स्वतःच्या आत्मशुद्धीसाठी शुद्ध भावनेने नामाचा महिमा जाणणे मानवाचे कर्तव्य आहे. दुःखाला सुखाचा विटाळ आहे, काळाला-स्थळाला विटाळ आहे. पंचभूतांना व 14 भूवनांना विटाळ आहे. तर माणूस तरी कुठे शुद्ध व स्वच्छ आहे? मनाच्या कल्पना व ढोंगी वृत्तीला चोखोबा स्पष्ट विरोध करीत नाहीत. मात्र भीकही घालत नाहीत.

वारकरी संप्रदायाची धुरा सांभाळणारे नामदेव, ज्ञानदेव यांच्या पिढीतील चोखामेळा होत. विचाराच्या देवाण-घेवाणीचा परिणाम म्हणून जातीयतेला हीन मानणाऱ्या या संत मंडळात अनेक जातीतील संत एक एक वैचारिक भूमिका स्पष्ट करण्यात सिद्ध व यशस्वी झाले हेच खरे. प्रत्येक समाजाला जगण्याचा अधिकार आहे, भक्तीचा अधिकार आहे. देव सर्वांचा आहे. तू कुणाच्या एकट्याच्यासाठी निर्माण झाला नाही. हा विचार मांडणारा व प्रचार-प्रसार करणारा संतवर्ग होता. जातीयतेचे बाळकडू लाभलेल्या समाजाला हा विचार पचला नाही. व्यवस्थेची जाणीव करून देणारा पहिला संत चोखामेळा आहे हे मान्य करावे लागेल.

**संदर्भ :**

१.श्री संत चोखामेळा महाराज यांचे चरित्र व अभंग – संपा.स.भा. कदम

२.ज्ञानेश्वरी प्रभावळ – ल.रा. पांगारकर .

३.संत चोखामेळा (अभंगवाणी)- कानडे/खांडेकर

४.संत साहित्याची सामाजिक फलश्रुती – ग. बा . सरदार .

५.चोखामेळा विकिपीडिया .

६.संत चोखामेळा WWW.COM